५

राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना वाहतूक भत्याची थकबाकी प्रदान करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय, क्रमांकः-वाहभ-१०९९/प्र.क्र.८२/९९/सेवा-५,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांकः- ७ सप्टेंबर १९९९

पहा:- १) शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक-वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/९८/ सेवा-५, दिनांक १४ डिसेंबर, १९९८.
२) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः-वाहभ-१०९८/ प्र.क्र.८३/९८/सेवा-५, दिनांक ६ जानेवारी, १९९९.

## शासन निर्णय

पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने राज्य शासकीय कमचारी व इतरांना वर नमूद केलेल्या अनुक्रमांक १ येथील आदेशाअन्वये दिनांक १ ऑक्टोबर, १९९८ पासुन वाहतूक भत्ता नव्याने मंजुर केला आहे.

२. केंद्र शासनाने आपल्या कर्मचा-यांना सदर भत्ता दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासुन मंजूर केला आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना वाहतूक भत्ता दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासुन मंजूर करण्याबाबतचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता.

३. शासन आता असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना वाहतूक भत्ता दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासुन मंजूर करण्यात यावा.

४. शासन आणखी असेही आदेश देत आहे की, वाहतूक भत्त्याची दिनांक १ ऑगस्ट, १९९७ ते दिनांक ३० सप्टेंबर, १९९८ या कालावधीतील थकबाकी संबंधितांना रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करण्यात यावी. ज्या कर्मचा-यांच्या बाबतीत भविष्य निर्वाह निधी खाते उघडण्यात आले नसेल अशा कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांचे खाते उघडण्यात येईल त्यावेळी थकबाकीची रक्कम काढून त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी. तसेच थकबाकीच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामधील उक्त जमा रकमेवर दिनांक ३१ मार्च २००२ पर्यन्तच्या कालावधीकरीता व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

५. शासन असाही आदेश देत आहे की, भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये यापोटी जमा होणा-या रकमेमधुन दिनांक ३१ मार्च, २००२ पर्यन्त कोणत्याही कारणास्तव संबंधितांना उचल किंवा अग्रिम दिले जाऊ नये.मात्र ज्या कर्मचा-यांच्या सेवा या कालावधीमध्ये कोणत्याही कारणास्तव समाप्त झाल्या असतील किंवा जे कर्मचारी निवृत्त झाले असतील किंवा ज्यांचे भविष्य निर्वाह निधी खाते बंद झालेअसेल अशांच्या बाबतीत या संदर्भात देय होणारी रक्कम रोखीने देण्यात यावी.

६. ज्या कर्मचा-यांना अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी योजना लागू आहे अशांच्या बाबतीत वाहतूक भत्त्याच्या थकबाकीची रक्कम त्या निधीमध्ये जमा करण्यात यावी. मात्र शासनाकडुन त्याबाबतीत कोणतेही अनुरुप अंशदान दिले जाणार नाही.

७. उक्त थकबाकीची रक्कम, हया भत्यावरील खर्च ज्या शिर्षाखाली खर्ची घालण्यात येतो त्याच शिर्षाखाली खर्ची घालण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
पुरवठा विभाग
दिनांक– 9/2/2000
विभाग–EST
सहा. जि. पु. अ. जिल्हा पु. अ.

श. वि. लागवणकर,
शासनाचे सह सचिव

(कृ.मा.प.